मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# शहाणा राजा शलमोन

लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Lazarus

रूपान्तरकार: Ruth Klassen

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2017 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही तीं कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

दाविद राजा देवाचा महान मनुष्य होता. शौल राजाच्या करकिर्दी पेक्षा त्याच्या कारकिर्दीत इस्त्राएल दहा पटीने वाढले. परंतू तो आता राज्यकारभार करु शकत नव्हता.



दाविद आता म्हातारा झाला होता. आणि थकलेला ! आजारी होता ! या जगातील त्याचे जीवन जवळपास पूर्ण होत आले होते.





दाविदाच्या मुलांपैकी
एक मुलगा, अदोनीया,
याने तो आता राजा बनणार
आहे असे इस्त्राएल लोकांना
सांगितले. त्याच्या नावाचा अर्थ
"माझा प्रभू, माझा देव आहे"
असा असला तरी, अदोनीया
चांगला मनुष्य नव्हता.



त्याला विरोध करण्यास
दाविद राजा आता फारच
अशक्त बनलेला आहे हे
ओळखून त्याने राजासन
बळकावण्याचा प्रयत्न
केला. परंतू देवाची
योजना वेगळी होती.



दाविदाची पत्नी बथशेबा हिचा मुलगा शलमोन याचे राजा होणे उचित आहे हे बथशेबाला माहित होते. तिने अदोनीयाच्या योजनेविषयी दाविदाला सांगितले. दाविद आजारी असतांनाच, दाविदाने त्याच्या सर्व पुढाऱ्यांना एकत्रित केले आणि लोकांसमोर शलमोनाला इस्त्राएल देशाचा राजा बनवले.



इस्त्राएल लोक दाविदावर भरोसा करीत असल्यामुळे शलमोनाला अदोनीयाचा जास्त त्रास झाला नाही. दाविदाने त्यांना सांगितले की, परमेश्‍वराने राजा होण्यासाठी ज्याची निवड केली आहे तो शलमोन आहे. त्यानंतर काही, दिवसांनी दाविद मरण पावला.



दाविदाने त्याच्या मृत्यूच्या आधि, देवाचे ऐकणे व चांगला राजा बनणे याविषयी शलमोनाशी बोलणे केले होते. दाविदाने सांगितले की, "देवाच्या मार्गाने चाल, म्हणजे जे काही तूं करशील त्यात तुझी भरभराट होईल." तो चांगला सल्ला होता ! मग शलमोन त्याच्या वडीलांच्या राजगादीवर बसला, आणि त्याच्या राज्याला मजबुती मिळाली.



ऐक रात्री, शलमोनाला एक स्वप्न पडले. त्याच्या स्वप्नात, देवाने त्याला दर्शन दिले आणि म्हटले, "तुला पाहिजे तो वर माग, तो मी तुला देईन." तुम्ही काय मागितले असते बरे? चांगला राजा होण्यासाठी शलमोनाने ...



... शहाणपण मागितले. तरुण राजाच्या मागणीने परमेश्वर खूश झाला. त्याने जे काही मागितले ते शलमोनाला मिळाले परंतू त्याच्याबरोबर परमेश्वराने त्याला धन आणि वैभव देखिल देण्याचे अभिवचन दिले.



शलमोनाचे शहाणपण लोकांना कळण्यास जास्त दिवस लागले नाही. एके दिवशी, एकाच बाळावर आपला हक्क सांगणाऱ्या दोन स्त्रीया त्याच्या समोर येऊन उभ्या राहिल्या. त्यातील एक म्हणाली की, "रात्री या बाईचा मुलगा मेला, तेंव्हा तिने माझ्या जिवंत मुलाची अदलाबदल केली."



दुसरी बाई म्हणाली, "नाही ! जो जिवंत आहे तो मुलगा माझा आहे, आणि तो मेलेला मुलगा तुझा आहे."

यांपैकी खरी आई कोण आहे
हे राजा कसे ओळखेल?



मग राजा म्हणाला, "माझ्याकडे एक तलवार आणा."
मग त्यांनी राजासमोर एक तलवार आणली. या तलवारीने राजा काय करणार असेल असे तुम्हांला वाटते?



आणि राजाने म्हटले, "या जिवंत मुलाचे कापून दोन तुकडे करा, अर्धा हिला द्या आणि अर्धा तिला द्या." तेंव्हा ज्या आईचे ते जिवंत मूल होते ती राजास

म्हणाली, "माझे स्वामी,
जिवंत मुलगा
तिला द्या, पण
त्यास मारुन
टाकू नका."



दुसरी बाई म्हणाली, "तो न माझा न तुझा, त्याचे दोन भाग करा."





मग राजाने म्हटले, "हा जिवंत
मुलगा पहिलीस द्या. तीच त्याची
आई आहे." राजाने हा न्याय केला
त्याविषयी सर्व इस्त्राएल लोकांनी
ऐकले, तेंव्हा त्यांच्या ठायी
राजाविषयी पुज्य बुध्दि् उत्पन्न
झाली. कारण न्यायइंन्साफ
करण्याचे दैवी ज्ञान त्याच्या
ठायी आहे हे त्यांस
दिसून आले.

मंदिरात जाऊन देवाची भक्ति करतील असे मंदिर इस्त्राएल लोकांकडे नव्हते.




जेव्हा दाविदाने मंदिर बांधण्याची योजना आखली होती तेंव्हा परमेश्वर देव असे म्हणाला होता की, "माझ्या नावाप्रीत्यर्थ तुझा मुलगा माझे घर बांधिल." म्हणून
शलमोनाने यरुशलेमेत सुंदर मंदिर बांधण्यास सुरवात केली.



मंदिर बांधण्यास सात वर्षांचा दीर्घ कालावधि लागला. परंतू तो महान दिवस उगवला, सर्व शलमोनाजवळ एकत्र

आले आणि त्यांनी ते मंदिर परमेश्वराला समर्पित केले.



अद्भुत प्रार्थनेनंतर,
राजाने व लोकांनी
आनंदाने हजारो अर्पणे
केली आणि दोन
आठवडे

पर्यंत मोठी
मेजवानी केली.

यानंतर, परमेश्वर देवाने
पुन्हा एकदा शलमोनाला
दर्शन दिले आणि जोपर्यंत ते
देवाच्या आज्ञा पाळतील तोपर्यंत



राजाला व इस्त्राएल
प्रजेला आशिर्वाद
देण्याचे अभिवचन दिले.



दुःखाची गोष्ट अशी की, शलमोन राजाने किंवा इस्त्राएल प्रजने; कोणीही निरंतरपणे परमेश्वराच्या आज्ञांचे पालन केले नाही. देवाची इच्छा नव्हती अशा कितीतरी स्त्रीयांशी शलमोनाने लग्न केले.



त्याच्या परराष्ट्रीय बायकांनी त्याचे मन मुर्तिपुजेकडे वळविले; आणि त्याचे वडील दाविद याच्याप्रमाणे त्याचा देव प्रभू परमेश्वर याच्याशी त्याचे मन निष्ठावान राहिले नाही.



शलमोनाने जेंव्हा देवाच्या आज्ञा पाळण्याची संधी गमवली, त्याच वेळी त्याच्या अधिकाऱ्यांपैकी यराबाम नावाचा एक अधिकारी होता याचा अनुभव मात्र वेगळा होता.



एका संदेष्ट्याने त्याला सांगितले की परमेश्वर शलमोनाच्या राज्याचे दोन तुकडे करणार आहे आणि बारा पैकी दहा वंशावर यराबाम राज्य करिल. यराबाम लवकरच मिसर देशात पळून गेला.

जर तो तेथेच राहिला असता तर





अखेरिस शलमोन राजा
मरण पावला. त्याचा मुलगा
रहबाम, याने लोकांवर
त्याच्या वडीलांपेक्षा अधिक
कर लावला. दहा वंशाजांनी
बंड केले आणि
यराबामला त्यांचा
पुढारी होण्यास
निवडीले.



देवाच्या संदेष्ट्यांने
सांगितल्या प्रमाणे
शलमोन राजाचे
महान राज्य दोन
भागात विभागले
गेले. आज्ञा न
पाळणाऱ्यांना देव
आशिर्वादित करु
शकत नाही !

# शहाणा राजा शलमोन

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

१ राजे १–१२

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गातल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!
जॉन 3:16